मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

सातारा दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २७७ * सातारा * सातारा बुधवार दि. १९ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

मी अजित दादांसोबत नाही, राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे

नाराजीच्या चर्चेनंतर छगन भुजबळ यांच विधान



मुंबई : गेल्या काही दिवसांपासूनराष्ट्रवादी काँग्रेसचेज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ हे पक्षात नाराज असल्याच्या चर्चांना जोर आला आहे. लोकसभेचं तिकिट नाकारल्याने आणि राज्यसभेवरही न पाठवल्याने छगन भुजबळहे नाराज असून राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत, अशाही चर्चा सुरू झाल्या आहेत. मात्र, खरंच असं आहे का? छगन भुजबळ नाराज आहेत का आणि ते पक्षांतर करतील का? त्यावर दस्तुरखुद्द छगन भुजबळांनी उत्तर दिले आहे.

नाराजीच्या चर्चेनंतर छगन भुजबळ यांनी बोलताना या सर्व अफवा असल्याचे सांगत मी अजितदादांसोबत नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे, असे म्हटले आहे. विधानसभेआधी अथवा नंतर मी कुठेही जाणार नाही. मी दादांबरोबर नाही तर राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे. कायमच राष्ट्रवादी काँग्रेससोबत राहीन, असे छगन भुजबळ म्हणाले. तसेच, मी नाराज आहे, दुसऱ्या नेत्यांना भेटलो आहे. विरोधी पक्षातल्या नेत्यांची भेट घेतली, या सगळ्या बातम्यांमध्ये तथ्य नाही. मला जर कुणाला भेटायचं असेल तर मी उघडपणे भेटेन, असे छगन भुजबळ यांनी सांगितले.याचबरोबर, माझ्या नाराजीच्या चर्चा साफ खोट्या आहेत. मी नाराज नाही. राजकारणात नाराज होऊन चालत नाही. राजकारणात प्रत्येकजण नाराज होतो अन् दुसऱ्या दिवशी कामाला लागतो. कमी जागा मिळाल्यामुळे राहुल गांधी नाराज असतील, मोदीसाहेबही नाराज असतील. शरद पवारही नाराज असतील.. देवेंद्र फडणवीसही नाराज असतील..अजित पवारहीबारामतीची जागा का गेली, यामुळे नाराज असतील. ज्याप्रमाणे नाराजीनंतर सर्व नेते कामाला लागले, तसेच मीही कामला लागलो आहे. मी नाराज नाही किंवा कुणालाही भेटलो नाही, असेही छगन भुजबळ म्हणाले.

भुजबळांनी सांगितला सगळा घटनाक्रम

१० जून : मी षण्मुखानंद हॉल येथील कार्यक्रमात होतो.

११ जून : आमच्या लोकांबरोबर मी होतो

१२ जून :अजित पवारयांच्या निवासस्थानी बैठक बोलवण्यात आली होती, त्या बैठकीत उपस्थित होतो.

१३ जून : राज्यसभेसाठी अर्ज भरायला विधानसभेत होतो.

१४ जून : पुण्यात गेलो होतो, तिथे काही बैठका घेतल्या. फुलेवाड्याच्या कामासाठी पुण्यात होतो.

१५ जून : येवल्यात होतो. तेथील हवं तर तेथील पत्रकारांना विचारा.

१६ जून : संध्याकाळी मी मुंबईत आलो. दरम्यान, मी अजितदादांसोबत नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे, असे विधान छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यामुळे आता छगन भुजबळ यांच्या विधानाचा नेमका अर्थ काय? याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे.

'सगेसोयरे'मुळे ओबीसीच नव्हे तर एससी, एसटी आरक्षणावरही गदा; हाकेंचा दावा

वडीगोद्री :'सगेसोयरे'चा अध्यादेश लागू झाला तर फक्त ओबीसी बाधित होत नाही, तर एससी आणि एसटी यांच्या आरक्षणावर पण गदा येते. शासन जोपर्यंतओबीसी आरक्षणालाधक्का लागत नाही हे लेखी सांगत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केला.

ओबीसी आरक्षणबचावसाठी हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्या बेमुदत उपोषणाचा मंगळवारी सहावा दिवस होता. यावेळी हाके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ओबीसी आरक्षणाला कसा धक्का लागत नाही? हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आम्हाला सांगावे. तसे उत्तर लेखी द्यावे. ओबीसीच्या आंदोलनाकडे फिरकत नाही, तर दुसरीकडे जरांगे यांच्या आंदोलनाला रेड कार्पेट घालता, अशी टीका हाके यांनी यावेळी केली

.प्रकाश आंबेडकरांनी केली विचारपूस

- वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याशी फोनवर चर्चा केली.

- शरद पवार गटाचे माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनीही आंदोलकांशी फोनद्वारे चर्चा करून विचारपूस केली.

- उद्धवसेनेचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी वडीगोद्रीतउपोषणस्थळी हाके व वाघमारे यांची भेट घेतली

.मनोज जरांगे यांना दिले आव्हान

आम्ही कोणत्या नेत्याला टार्गेट केले नाही. आम्ही कायदा तोडून काहीही केले नाही. यांना ओबीसी कोण हे माहिती आहे का? अशी टीका हाके यांनीमराठा आरक्षणनेते मनोज जरांगे यांच्यावर केली. तसेच माझ्या समोर चर्चेला बसावे, मी सर्व उत्तरे देतो, असे खुले आव्हानदेखील जरांगे यांना हाके यांनी दिले.

पाणी पातळी खालावली

- ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची सकाळी तपासणी केली.

- दोन्ही आंदोलकांचे ब्लड प्रेशर चांगले आहे, मात्र पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे चक्कर येत आहे. त्यांनी उपचार घेण्यास नकार दिल्याचे, जिल्हा शल्य चिकित्सक राजेंद्र पाटील यांनी सांगितले.

शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकरी रस्त्यावर

दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा

कोल्हापूर : राज्य शासनाने अधिसूचना काढून नागपूर ते गोवा असा आठशे पाच किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग करणार असल्याचे जाहीर केला आहे. यासाठी चाळीस हजार एकर जमीन संपादित केली जाणार असून ८६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या महामार्गास बारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध होत आहे. आज कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर घेरा डालो, डेरा डालो घोषणेसह मोर्चा काढण्यात आला.

यावेळी शक्तीपीठ महामार्ग रद्द करा, अशा जोरदार घोषणा देत दसरा चौक, व्हिनस कॉर्नर, बसंत बहार रोड मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. भांडवलदार सरकार मुर्दाबाद, जैवविविधतेचे जतन करा, शेतकरी मागतो स्वामीनाथन आयोग, सरकार करते शक्तिपीठ प्रयोग, किसान एकता जिंदाबाद, शेतकरी कामगार विरोधी शासनाचा अधिकार असो, अशा आशियाचे फलक घेतलेले हजारों शेतकरी या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

काहींनी वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा करून आपल्या मागणीकडे सरकारचं लक्ष वेधलं. यामध्ये बैलगाडी सहभागी झालेले शेतकरी, रावणाच्या वेशभूषेत सहभागी झालेले सांगलीवाडी येथील दत्ता पाटील शेतकरी, यांनी सर्वांचं लक्ष वेधलं.यावेळी शिष्टमंडळाच्यावतीनं आपल्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना देण्यात आला, यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ सुद्धा उपस्थित होते.

यावेळी खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार ऋतुराज पाटील, समितीचे समन्वयक गिरीश फोंडे, विजय देवणे, माजी आमदार के. पी. पाटील, डॉक्टर भारत पाटणकर, कॉ. संपत देसाई, कॉ. शिवाजी मगदूम, सम्राट मोरे, शिवाजी मगदूम, महादेव धनवडे , प्रसाद खोबरे, प्रकाश पाटील, के डी पाटील , प्रकाश पाटील, शिवाजी कांबळे, प्रिया बाणदार, पूजा मोरे, मच्छिंद्र मुगडे, आनंदा पाटील , योगेश कुळमोवडे, सुधाकर पाटील, तानाजी भोसले , युवराज पाटील, बाळासाहेब पाटील यांच्यासह जिल्हयातील शेतकरी उपस्थित होते.

हजसाठी गेलेल्या ५५० भाविकांचा मक्केमध्ये उष्माघाताने मृत्यू

२,००० यात्रेकरू रुग्णालयात दाखल

दिल्ली : सौदी अरबसह मध्य पूर्व आशियात उष्णतेची लाट पसरली आहे. दरम्यान, हज यात्रेवरही (मक्का, सौदी अरब) उष्णतेच्या लाटेचा गंभीर परिणाम झाला आहे. तब्बल ५५० हज यात्रेकरुंचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. मृतांमधील ३२३ भाविक हे इजिप्तचे नागरिक होते. सौदी अरबमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने म्हटलं आहे की, या भाविकांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे, तर एका व्यक्तीचा गर्दी चेंगरून मृत्यू झाला आहे. मक्केजवळील अल-मुसाइम येथील रुग्णालयाच्या शवागारातून मिळालेल्या माहितीनुसार उष्माघाताने ५५० हज यात्रेकरूंचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने दिली आहे.

इस्लाम धर्मामध्ये हज यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक मुस्लीम व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी हजला जायला हवं असं म्हटलं जातं. त्यामुळे जगभरातील लाखो मुस्लीम व्यक्ती दररोज हज यात्रेसाठी मक्केला जातात. दरम्यान, सौदीमधील हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार हवामान बदलामुळे तिथल्या वातावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. तसेच हज यात्रेवरही त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. तिथलं सरासरी तापमान ०.४ अंशांनी वाढत आहे. सौदी राष्ट्रीय हवामान विज्ञान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार सोमवारी मक्का येथील ग्रँड मशिदीच्या परिसरात ५१.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

हजसाठी मक्का शहरात आलेल्या ५५० भाविकांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे, तर २,००० हून अधिक भाविकांची प्रकृती खालावली असून त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार चालू आहेत. मृतांची संख्या वाढू शकते, असं स्थानिक माध्यमांनी म्हटलं आहे. हज यात्रेकरून रांगेत उभे असताना सतत डोक्यावर पाणी ओतून घेत असल्याचं चित्र सोमवारी पहायला मिळालं. यात्रेकरूंना उन्हाचा कमीत कमी त्रास व्हावा यासाठी तिथले वॉलेन्टियर्स लोकांना पाणी, कोल्ड ड्रिंक्स, आईसक्रिम वाटत होते.

हज व्यवस्थापन समितीने भाविकांना छत्रीचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जास्तीत जास्त पाणी प्या, दुपारच्या वेळी बाहेर पडू नका, अशा सूचना देखील दिल्या आहेत. शनिवारी माऊंट अराफात येथे प्रार्थना आणि अनेक हज विधींसाठी यात्रेकरुंना दुपारच्या उन्हात थांबावं लागलं होतं. अनेक भाविक तासनतास तिथे उभे होते. त्यामुळे अनेकांची प्रकृती खालावली होती.

नीरज चोप्राचा पुन्हा 'सुवर्णवेध'

पावो नूरमी गेम्समध्ये गोल्ड मेडलवर कोरलं नाव

दिल्ली : भारताचा गोल्डनबॉय आणि उत्तम भालाफेकपटू नीरज चोप्राने इतिहास रचला आहे. पावो नूरमी गेम्स २०२४ मध्ये त्याने गोल्डमेडलवर आपलं नाव कोरलं आहे. पहिल्यांदाच नीरज चोप्रा या खेळात सुवर्णपदक जिंकला आहे. २०२३ मध्ये नीरज या स्पर्धेत भाग घेऊ शकला नव्हता. तर २०२२ मध्ये त्याला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं होतं. मात्र मंगळवारी फिनलँड या ठिकाणी झालेल्या पावो नूरमी गेम्स स्पर्धेत (१८ जून) नीरज चोप्राने ८५.९७ मीटर दूर भाला फेकत सुवर्ण पदक जिंकलं आहे. नीरज चोप्राच्या या कामगिरीचं देशात कौतुक होतं आहे.

नीरज चोप्राने टोकियो ऑलिंपिक च्या दरम्यान भाला फेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला होता. आता २६ जुलै २०२४ पासून पॅरीसमध्ये ऑलिंपिक स्पर्धा सुरु होते आहे. अशात पावो नूरमी गेम्समध्ये नीरज चोप्राने केलेली कामगिरी ही त्याच्या चाहत्यांसाठी आणि भारतासाठी नक्कीच आनंदाची बातमी आहे. नीरजच्या नंतर त्याचा प्रतिस्पर्धी टोनी केरानेन याने ८४.१९ मीटर दूर भाला फेकला होता. त्याला रौप्य पदक देण्यात आलं आहे. तर ओलिवयर हेलांडरने ८३.९६ मीटर अंतरावर भाला फेकला त्याला कांस्य पदक देऊन गौरवण्यात आलं आहे.

एकूण सहा फेऱ्यांमध्ये कशी होती नीरजची कामगिरी?

स्पर्धेत एकूण सहा फेऱ्यांपैकी पहिल्या फेरीत नीरजने ८३.६२ मी., तर दुसऱ्या फेरीत ८३.४५ मी. भालाफेक केली. ८५.९७ मी. ची भालाफेक त्याची सर्वोच्च ठरली. चौथ्या फेरीत ८२.२१ मी. भाला फेकला पाचव्या फेरीत त्याचा फाऊल झाला. तर सहाव्या फेरीत ८२.९७ इतकी भालाफेक केली. भारताच्या नीरज चोप्राला ९० मीटर दूर भाला फेकता आलेला नाही. हा टप्पा ओलांडण्याचे लक्ष त्याने ठेवले आहे. परंतु, खांदा दुखीमुळे त्याला त्यात अडथळा येत आहे. जर्मनीच्या मॅक्स डेहनिंगने हॉल येथे झालेल्या स्पर्धेत ९०.२० मीटर भाला फेकून विक्रम नोंदवला होता. हा मॅक्सही फिनलँडमधील स्पर्धेत होता; पण त्याला फारशी चमकदार कामगिरी करता आली नाही.

संपादकीय

महिला मतदारांची ताकद

स्त्रियांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे दर्शन जेमतेम १४ टक्के एवढेच झालेयंदाच्या लोकसभानिवडणुकीत सगळ्यांचे लक्षबारामतीमतदारसंघातील 'नणंद-भावजयी'च्या लढतीवर लागले होते. एरवी सर्वसामान्य कुटुंबातही हे नाते तसे 'राजकीय'च असते. ते प्रत्यक्ष निवडणुकीच्या आखाड्यात आल्यावर त्याचा 'टीआरपी' वाढणार हे उघड होते. त्यात कुणाचा तरी विजय आणि कुणाचा तरी पराजय, हेही ठरलेलेच. पण पराभूत झालेल्या सुनेत्रा पवार खासदार होऊन मागच्या दाराने तातडीने राज्यसभेत पोहोचल्या हेदेखील अगदी भारतीय राजकारणातील स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाचे नेमके प्रतिबिंब दाखवणारे ठरले. 'कुणाचे तरी कुणी तरी' म्हणजे कुणाची मुलगी, बहीण, बायको असल्याशिवाय स्त्रियांना राजकीय क्षेत्रातील दरवाजे इतके सताड आणि सहज उघडत नाहीत, हे आपले पिढ्यानपिढ्यांचे राजकीय वास्तव. प्रत्येक निवडणुकीत ते अधोरेखित होत जाते. २०२४ ची लोकसभा निवडणूक अनेक अर्थांनी वेगळी ठरली असली तरी तिने स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाबाबतचे कोणतेही 'फंडे' बदलले नाहीत. ना कोणत्याही पक्षाने एरवीपेक्षा जास्त प्रमाणात स्त्रियांना उमेदवारी दिली, ना स्त्री प्रतिनिधींची लोकसभेमधली टक्केवारी वाढली. नाही म्हणायला मतदान करायला बाहेर पडलेल्या स्त्रियांचे प्रमाण वाढले, पण निवडून आलेल्या स्त्रियांचे प्रमाण मात्र गेल्या लोकसभेपेक्षा थोडेफार कमीच झाले.

दर निवडणुकीत अशी टक्केवारी थोडीफार मागेपुढे होणारच असे जर कुणाला वाटत असेल तर त्यांना 'पर्सनल इज पोलिटिकल' ही म्हण माहीत नाही, असेच म्हणावे लागेल. या जगात जन्मलेल्या अगदी प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी आपले स्वत:चे हितसंबंध महत्त्वाचे वाटणे, ते पुढे रेटण्यासाठी त्याने प्रयत्न करणे योग्य असेल तर भारतासारख्या जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात स्त्रियांचा सत्तेतील सहभाग इतका नगण्य कसा असू शकतो? सत्तेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, ती मिळवणे आणि ती मिळाल्यावर आपल्याला योग्य वाटतात त्या हितसंबंधांसाठी ती राबवणे हेच लोकशाही प्रक्रियेत अभिप्रेत असताना या माध्यमातून आपले म्हणजे समस्त स्त्रियांचे हितसंबंध पुढे रेटावेत, हे फारशा स्त्रियांनाच वाटत नाही, असे का? त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नसतेच का?

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार या वेळेला ५४३ मतदारसंघांसाठी एकूण आठ हजार ३६० उमेदवार लोकसभेसाठी उभे राहिले, त्यामध्ये ७९७ स्त्रिया होत्या. आणि त्यापैकी ७४ जणी म्हणजे साधारण १३.६ टक्के स्त्रिया खासदार म्हणून निवडून आल्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हेच निवडून येण्याचे प्रमाण १४ टक्के होते. तेव्हा ७२६ जणी निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या होत्या आणि त्यापैकी ७८ जणी निवडून आल्या होत्या. या वेळी निवडून आलेल्या स्त्रियांपैकी ४३ जणी पहिल्यांदा खासदार झाल्या आहेत. तर लालू यादव कन्या मिसाभारती पहिल्यांदाच निवडून आल्या आहेत.

लोकसभेचे वय सरासरी ५६ वर्षे आहे तर स्त्री खासदारांचे वय सरासरी ५० वर्षे आहे. या ७४ जणींमध्ये भाजपच्या खासदार ३१, काँग्रेसच्या १४, तृणमूल काँग्रेसच्या ११, इतर म्हणजेच झामुमो, राष्ट्रवादी (शरद पवार गट), अपना दल, राजद, तेलुगु देसम वगैरे मिळून सात, समाजवादी पक्षाच्या पाच, द्रमुक तीन, संयुक्त जनता दल दोन आणि लोकजनशक्ती-पासवान पक्षाच्या दोघी निवडून आल्या आहेत.विशेष म्हणजे स्त्री मतदारांचे प्रमाण मात्र या वेळी गेल्या म्हणजे २०१९च्या निवडणुकीच्या तुलनेत वाढले आहे. २०१९ च्या निवडणुकीत एकूण स्त्रियांपैकी ६७.४० टक्के स्त्रिया मतदानासाठी बाहेर पडल्या होत्या. तर २०२४ मध्ये हेच प्रमाण ६५.७९ एवढे होते. या वेळच्या निवडणुकीत एकूण ६४.२ कोटी जणांनी मतदान केले, त्यात स्त्रियांचे प्रमाण जवळपास निम्मे म्हणजे तब्बल ३१.२ कोटी होते. म्हणजे निवडणुकीत मतदान करून आपल्याला योग्य वाटतो तो लोकप्रतिनिधी निवडून आणण्याचे महत्त्व त्यांना माहीत आहे. राजकीय पक्षांच्या दृष्टीनेही स्त्री मतदारांचे प्रमाण महत्त्वाचे असल्यामुळे वेगवेगळ्या पक्षांच्या जाहीरनाम्यांमधूनही त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले जाते. भाजपच्या जाहीरनाम्यामधून बचत गटाच्या माध्यमातून 'लखपती दीदीं'चे प्रमाण वाढवणार असल्याचे सांगितले गेले होते. पक्षाकडून २०१४ मध्ये 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' त्यानंतर 'नमो ड्रोन दीदी'सारख्या योजना जाहीर केल्या गेल्या होत्या. महिला आरक्षण विधेयक, ट्रिपल तलाक रद्द या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांवर भर दिला होता. काँग्रेसनेही दरमहा खात्यात ८,५०० रुपये 'खटाखट' जमा होऊन सर्व गरीब स्त्रियांना लखपती करणार असल्याचे जाहीर केले होते. आरक्षण विधेयक तातडीने लागू करणार, स्त्रियांना सरकारी नोकरीत ५० टक्के आरक्षण देणार असेही काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील मुद्दे होते. पण मतदार म्हणून स्त्रियांना महत्त्व देणारे हेच राजकीय पक्ष स्त्रियांना उमेदवारी देण्याची वेळ आली की मात्र हात आखडता घेतात. राजकीय नेत्यांना ओवाळायला, पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये व्यासपीठावर हारतुरे आणून द्यायला, पक्षाच्या आंदोलनांमध्ये घोषणा द्यायला स्त्री कार्यकर्त्या आणि निवडणुका लढवायला राजकीय घराण्यांमधल्या लेकीसुना हे चित्र बदलताना दिसत नाही

या मातीत जन्मलेल्या इंदिरा गांधींपासून बाहेरून येऊन इथल्या राजकारणात आपली पाळेमुळे रुजवणाऱ्या सोनिया गांधींपर्यंत राजकीय वारसा असलेल्या अनेक स्त्रिया भारतीय राजकारणात ठसा उमटवताना दिसतात. कोणताही राजकीय वारसा नसताना जयललिता, सुषमा स्वराज, शीला दीक्षित, उमा भारती, मायावती, ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदापर्यंत धडक मारली होती. राजकीय वारसा असलेल्यासुप्रिया सुळेजितक्या बेधडक आणि मुद्देसूदपणे संसदेत बोलतात, तितक्याच कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या महुआ मोईत्रा आपल्या 'पोलिटिकल करेक्टनेस'मधून बिनधास्त असतात. ही उदाहरणे समोर असली तरी आजही राजकारण हा स्त्रियांचा प्रांत आहे, असे सहसा मानले जात नाही.

वैमानिक व्हायचेय, अंतराळवीर व्हायचेय, ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवायचे आहे असे म्हणणाऱ्या मुलीचे सहजसुलभ कौतुक होते, पण 'मला मुख्यमंत्री व्हायचेय' असे म्हणत आपली राजकीय महत्त्वाकांक्षा पहिल्या दिवसापासून जराही लपवून न ठेवणाऱ्यापंकजा मुंडेयांचे काय होते, तेही सर्वश्रुत आहे. त्यांच्या संदर्भातली बाकीची राजकीय गणिते बाजूला ठेवली तरी 'राजकारणात जायचेय' असे म्हणणारीला उलट नाउमेदच केले जाते. अशी काही महत्त्वाकांक्षा बाळगणे हेच कसे चुकीचे आहे, सत्ता ही गोष्ट मुळात स्त्रीसाठी नाहीच, हेच पहिल्यापासून तिच्या मनावर बिंबवले जाते. या क्षेत्रात असलेली पुरुषप्रधानताही तिला तिथे येऊ देत नाही. तरीही आपल्या महत्त्वाकांक्षा घेऊन ती तिथे पोहोचली तरी साध्या साध्या गोष्टी मिळवण्यासाठी तिला धडका माराव्या लागतात.

...आता महाराष्ट्र हातात घ्यायचा आहे

बारामतीत शरद पवारांनी फुंकले विधानसभेचे रणशिंग

बारामती(पुणे) : काही लोक त्यांच्याकडे असणाऱ्यासत्तेचा गैरवापर करतात. सत्तेचा वापर करुन लोकांचे प्रश्न सोडवत नाहीत. लोकांच्याप्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्यालोकांना त्यांची जागा दाखवावी लागेल. त्यासाठी येणारी निवडणुक आहे. लोकसभेत तुम्ही चांगले काम केले. आता काही झालं तरी महाराष्ट्र हातात घ्यायचा आहे. शेतकरी, मजुर, कामगारांसह प्रत्येक घटकासाठी सत्तेचा वापर करायचा आहे. तुमचे प्रश्न सोडवून योग्य दिवस येतील अशी काळजी घेतली जाईल, अशा शब्दांतज्येष्ठ नेतेशरद पवारयांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

वडगांव निंबाळकर (ता.बारामती) येथे जनसंवाद दौऱ्याच्या वेळी आयोजित सभेत पवार बोलत होते. पवार पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्याऊस गाळपासह, ऊस दर, साखर वीज, इथेनॉलच्या दराबाबत सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने साखरधंदा अडचणीत आला. संस्थाचालकांना माझी विनंती आहे, बाबांनो इतके वर्ष तुम्ही आमचे आशीर्वाद घेतले.आम्ही तुम्हाला सगळ्यांच्या भल्यासाठी पाठिंबा दिला. मात्र, या सगळ्यांच्या भल्याची तुम्हाला आठवण नसेल तर तुमच्यासाठी काय करायचे याचा निकाल आम्हाला घ्यावा लागेल, अशा शब्दात ज्येष्ठ नेतेशरद पवारयांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह साखर कारखाना पदाधिकाऱ्यांचे नाव न घेता इशारा दिला.पवार पुढे म्हणाले, यंदाची लोकसभा निवडणुक वेगळी होती, ती सोपी नव्हती. देशात आणि परदेशात देखील या निवडणुकीची चर्चा झाली. राज्याची सत्ता दुसऱ्यांच्या हातात आहे, काही लोकांना दमदाटीचे प्रकार घडले. सगळ्या देशात इथ काय होईल, याची शंका होती. आमचे पदाधिकारी गावोगाव जात असत. पहिली निवडणूक यावेळी गावात पुढे कोणी येत नव्हते, सर्वजण शांत होते. न बोलणारी यंदा निवडणूक झाली. त्यामुळे अनेकांना या ठिकाणी काय होईल, याची काळजी होती. मात्र मला खात्री होती नेमके तेच घडले. जे लोक पुढे येत नव्हते, शांत होते. त्यांना कोणते बटण दाबायचे हे सांगावे लागले नाही. मतमोजणी झाल्यावर हे स्पष्ट झाले. त्यामुळे आम्हाला आता लोकांच्या कामावर अधिक लक्ष द्यावे लागेल, असे पवार म्हणाले. आज राज्यात वेगळ्या लोकांची सत्ता आहे. मोदीसाहेब देशाचे पंतप्रधान आहेत.

त्यांनीसबंध देशात वेगळा विचार दाखवायचा प्रयत्न केला. त्यांच्यासमोर कोणी टिकणार नाही, असे लोकांना वाटले. राज्यात त्यांनी १६ ठिकाणी सभा घेतल्या. माझे भाग्य प्रत्येक ठिकाणी त्यांनी माझे नाव घेत टीका केली. महाविकास आघाडीने४८ पैकी ३१ जागा जिंकल्या.

ज्या बारामतीची शंका होती, त्याठिकाणी ४० हजारांपेक्षा अधिक मते मिळाली. प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, सत्तेचा गैरवाप करणारे असो, वेगळे भाष्य करणारे असो, फोन करुन धमकी दिलेली असो, सगळ्यांनी याची नोंद न घेता योग्य ठिकाणी मतदान करीत मतांचा विक्रम केल्याचे पवार म्हणाले. यावेळी युगेंद्र पवार, सदाशिव सातव, ॲड एस. एन जगताप, सतीश खोमणे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.'साहेबां'ची आतापासूनच बारामतीत तळ ठोकण्यास सुरुवात-बारामती विधानसभा निवडणूकशरद पवार यांनी गांभीर्याने घेतली आहे. त्यांनी आतापासूनच बारामती शहर आणि तालुका पिंजून काढण्यास सुरवात केली आहे.पवार यांनी घातलेले लक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांची चिंता वाढवणारे आहे. मागील आठवड्यापासूनचशरद पवार यांनी बारामतीत विशेष लक्ष घातले आहे. त्यांनी डॉक्टर, व्यापारी, वकील आदी मेळावे घेत दुष्काळी दौरे केले. त्यापाठोपाठ दुसऱ्याच आठवड्यात तीन दिवसांच्यादौऱ्यांवर पवार आले आहेत. आज पहिल्याच दिवशी त्यांनी युगेंद्र पवार यांना बरोबर घेत निंबुत, वडगांव निंबाळकर, कोर्हाळे, करंजे पुल, माळेगांव येथे जनसंवाद दौरे आयोजित करीत संवाद साधला.

१९ जुन रोजी पवार यांचे सकाळपासून सायंकाळपर्यंत सांगवी, खांडज, निरावागज, डोर्लेवाडी, काटेवाडी, पिंपळी येथे शेतकरी, ग्रामस्थयांच्याबरोबर संवाद साधणार आहेत. तर गुरुवारी (दि. २०) रोजी ते पणदरे, लाटे, लोणीभापकर, मोरगाव येथे शेतकरी संवाद साधणार आहेत.

पंचगंगेची प्रदूषणमुक्ती केव्हा ? नागरिकांचा संतप्त सवाल

पंचगंगानदीचे प्रदूषण रोखण्यात महापालिका प्रशासनाने बऱ्याच उपाययोजना केल्या असल्या तरी त्यास शंभर टक्के यश आलेले नाही. आजही शहरातील ३० एमएलडी सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. शंभर टक्के सांडपाणी रोखणे आणि त्यावर योग्य प्रक्रिया करण्यास आणखी किमान दीड वर्ष लागणार आहे. हे सांडपाणी रोखून त्यावर प्रक्रिया करण्याची २८० कोटींची कामे लवकरच सुरू होणार आहेत. नदीच्या प्रदूषणात सर्वांत मोठा वाटा कोल्हापूर आणि इचलकरंजी महापालिकेचा आहे; परंतु या दोन्ही महापालिकांना या प्रदूषणाबद्दल फारसे देणेघेणे नाही, असाच अनुभव गेल्या दशकातील आहे.

सर्वाधिक सांडपाणी वाहून नेणारा दुधाळी हा दुसऱ्या क्रमांकाचा नाला आहे. या नाल्यावर १७ 'एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प कार्यान्वित आहे. आता आणखी सहा एमएलडी क्षमतेचे जादा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येत असून, त्याचे काम पूर्णत्वाकडे गेले आहे.

शहराच्या हद्दवाढीस विरोध करणाऱ्या शहरालागतच्या कळंबा, पाचगाव, आर. के. नगर, मोरेवाडी या गावांतील सुमारे १५ एमएलडी सांडपाणी रोज जयंती व गोमती नाल्यातून येत असून, या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा भार महापालिका यंत्रणेवर पडला आहे.

शहरातील लक्षतीर्थ वसाहत, सीपीआर, राजहंस, लाइन बाजार, बापट कॅम्प येथून येणाऱ्या नाल्यातील सांडपाणी पंचगंगा नदीत मिसळत आहे. या नाल्यावर फायटो ट्रीटमेंट, तसेच ब्लिचिंग पावडरचा तात्पुरता डोस दिला जात आहे.

सध्या कार्यरत सांडपाणी प्रक्रिया केंद्रकसबा बावडा - ७६ एमएलडीदुधाळी - १७ एमएलडीकसबा बावडा - ६ एमएलडी

प्रस्तावित कामे अशी -दुधाळी ड्रेनेज लाइन, एसटीपी - ५७ कोटी जयंती नाला उपसा केंद्र व एसटीपी - ५२ कोटीलाइन बाजार ड्रेनेज, उपसा केंद्र - ३२ कोटीबापट कॅम्प झोन ड्रेनेज लाइन, एसटीपी - १३९ कोटीतीन कामांच्या निविदा प्रसिद्ध, एकाची प्रक्रिया सुरू

रोजच्या सांडपाण्याचा हिशोबरोज निर्माण होणारे सांडपाणी - १३५ एमएलडीरोज प्रक्रिया होणारे सांडपाणी - १०५ एमएलडीथेट नदीत मिसळणारे सांडपाणी - ३० एमएलडी

रखडलेले भूसंपादन

लाइन बाजार येथे नाला अडविण्याकरिता बंधारा घालावा लागणार आहे. त्या ठिकाणी सहा एमएलडी उपसा केंद्र उभारण्याकरिता लागणारी जागा लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनात अडचणी आल्या आहेत. मूळ मालकांनी विरोध केल्याने भूसंपादनाचे काम रखडले आहे.

नगरमधून उमेदवारी करण्याची ईच्छा नाही; पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केली भूमिका

अहमदनगर : मी अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, अशी मागणी भाजपाचे येथील शहर जिल्हाध्यक्षांनी केली आहे. त्यांचे मी आभार मानते मात्र, यावर माझे कोणतेही मत नसून तशी माझी ईच्छा नाही. अशी भूमिका भाजपा नेत्यापंकजा मुंडेयांनी स्पष्ट केली.

मुंडे या रविवारी छत्रपती संभाजीनगर येथून आष्टीकडे जात असताना भाजपा कार्यकर्त्यांच्यावतीने त्यांचे नगर शहरात स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी माजी आमदार शिवाजी कर्डिले, सुखदेव पवार,सोनू भुजबळ, अमोल सुरसे,भारतीय जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष दीपक दहिफळे, नितीन शेलार, कैलास गर्जे, बंटी ढापसे, सरपंच अमित आव्हाड, सार्थक आंधळे, सरपंच बापू आव्हाड, वैभव झोटिंग अतुल गीते, सतीश ढाकणे, संकेत डोळे, सतीश घोडके, किशोर बडे, सौरभ सानप, विजय भालेकर, ज्ञानेश्वर आव्हाड,सुजल आंधळे, रविराज आव्हाड, युवराज शिरसाठ आदी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीनंतर मुंडे या प्रथमच शहरात आल्या होत्या. लोकसभा निवडणुकीत आपला पराभाव झाला असला तरी तुम्हीच आमच्या नेत्या आहात. अशी भावना याप्रसंगी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी मुंडे म्हणाल्या पराभवाने खचून जाऊ नका. कार्यकर्त्यांनी भावनाविवश होऊन कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन त्यांनी केले.

छत्तीसगडमधील विकास कामांमुळे नागपूर मार्गे धावणाऱ्या १० गाड्या रद्द

नागपूर : मध्य रेल्वेच्या बिलासपूर विभागातील कोटारालिया जवळ सुरू असलेल्या विकास कामांमुळे ब्लॉक केला जाणार आहे. त्यामुळे भूवनेश्वर एक्सप्रेस, हावडा, पुणे संत्रागाछी एक्सप्रेससह १० रेल्वेगाड्या वेगवेगळ्या तारखांना रद्द करण्यात आल्या आहेत. परिणामी प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याचे संकेत आहेत.

कोटारालिया येथे एनटीपीसी नलाईपल्ली खाणीच्या लाईन कनेक्टिव्हिटी संबंधाने त्या मार्गावर नॉन इंटरलॉकिंग वर्क केले जाणार आहे. परिणामी या मार्गाने धावणाऱ्या अनेक रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक प्रभावित होणार आहे. नागपूर मार्गे वेगवेगळ्या तारखांना धावणाऱ्या खालील १० रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

२९ जूनला धावणारी ट्रेन नंबर २०८२२ संत्रागाछी पुणे एक्सप्रेस, १ जुलैला धावणारी ट्रेन नंबर २०८२१ पुणे संत्रागाछी एक्सप्रेस, २६ आणि २९ जूनला धावणारी ट्रेन नंबर १२८७९ एलटीटी भूवनेश्वर एक्सप्रेस, २४ आणि २७ जूनला धावणारी ट्रेन नंबर १२८८० भूवनेश्वर एलटीटी एक्सप्रेस, २५ जून ते ३० जूनपर्यंत धावणारी ट्रेन नंबर १२१३० हावडा पुणे एक्सप्रेस, २७ जून ते२ जुलै पर्यंत धावणारी ट्रेन नंबर १२१२९ पुणे हवाडा एक्सप्रेस, २४, २५, २८ आणि २९ जुनला धावणारी ट्रेन नंबर १२१०१ एलटीटी शालीमार एक्सप्रेस, २६, २७, ३० जून आणि १ जुलैला धावणारी १२१०२ शालीमार एक्सप्रेस, २५ आणि २९ जूनला धावणारी १७००७ सिकंदराबाद दरभंगा एक्सप्रेस तसेच २८ जून आणि २ जुलैला धावणारी १७००८ दरभंगा सिकंदराबाद एक्सप्रेस आदी गाड्यांचा रद्द करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये समावेश आहे.

मनपा मुख्यालयाची सुरक्षा होणार भक्कम

प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर, लवकरच बॅग स्कॅनरही

मुंबई : मुंबई महापालिकेची सुरक्षा यंत्रणा आणखी भक्कम होणार असून, पालिका मुख्यालयाच्या हेरिटेज व विस्तारित इमारतीच्या प्रवेशद्वारावर नवीन मेटल डिटेक्टर बसवण्यात आले आहेत, तर येत्या काही दिवसांत बॅग स्कॅनर बसवण्यात येणार आहेत.

मुख्यालयातील मेटल डिटेक्टर व बॅग स्कॅनर नादुरुस्त असल्याने मुख्यालयाची सुरक्षा यंत्रणा काहीशी कमकुवत झाली होती. सुरक्षा उपकरणाच्या अभावी सुरक्षारक्षकांवर अतिरिक्त ताण पडत होता. तो ताण आता काही प्रमाणात कमी होईल. मुख्यालयात प्रवेश करताना मेटल डिटेक्टर बसवले आहे. अनेक दिवसांपासून पूर्वीचे मेटल डिटेक्टर नादुरुस्त आहेत. त्यामुळे मुख्यालयात येणाऱ्यांची व्यवस्थित तपासणी होत नव्हती. सामानाची तपासणी करणेही अवघड झाले होते. बॅग स्कॅनरच्या अभावी सामान तपासणीत अडचण येत होती.

सीसीटीव्हीसाठी तरतूद-

१) तपासणीतील उणीव दूर करण्यासाठी पालिकेने नवीन मेटल डिटेक्टर खरेदी केले आहेत. ते आता मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर बसवण्यात आले आहेत.

२) बॅग स्कॅनरमुळे सामानाची तपासणीही जलदगतीने करणे शक्य होईल. मुख्यालयाच्या धर्तीवर २५ विभाग कार्यालयातही मेटल डिटेक्टर आणि बॅग स्कॅनर बसवण्यात येणार आहेत. त्याशिवाय पालिकेच्या महत्त्वाच्या मालमत्ता असलेल्या ठिकाणीही सुरक्षा यंत्रणा भक्कम केली जाणार आहे.

३) पालिका मुख्यालय, विभाग कार्यालये आणि अन्य मालमत्तांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी वर्षभरात ६ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

राज्य मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचाली

सातारा : राज्यमंत्रीमंडळ विस्ताराबाबत हालचाली सुरू असून, पाठीमागे स्वत:हून दूर राहिलेल्या आमदार मकरंद पाटील यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडू शकते, तर भाजपमधूनही आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जयकुमार गोरे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. सध्या जिल्ह्यात एक मंत्रिपद असले, तरी आणखी दोन मंत्र्यांची भर पडू शकते, असे सध्याचे तरी चित्र आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यातच ऑक्टोबर महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर इच्छुकांची नाराजी दूर करणे आणि महायुतीची ताकद वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच पुढील आठवड्यात राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्यापूर्वीच मंत्रीमंडळ विस्तार होऊ शकतो. यासाठी महायुतीतील तिन्ही वरिष्ठ नेत्यांत याबाबत चर्चा सुरू असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात विस्तार होऊ शकतो. भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाकडूनही अनेकजण इच्छुक आहेत.

अनेकांनी फिल्डींग लावण्यास सुरुवात केली आहे.साताराजिल्ह्यालाही या मंत्रीमंडळ विस्तारात स्थान मिळू शकते. राष्ट्रवादीकडून वाईचे आमदार मकरंद पाटील हे दावेदार आहेत. एक वर्षापूर्वी अजित पवार महायुतीबरोबर गेल्यावर ९ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मंत्रिपदासाठीचे १० वे नाव हे मकरंद पाटील यांचे होते. पण, त्यावेळी ते स्वत:हून बाजूला राहिले. या विस्तारातही ते दावेदार आहेत.

अजित पवार कोणाला ताकद देणार हे लवकरच स्पष्ट होईल, तर भाजपमधून आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जयकुमार गोरे दावेदार आहेत. आमदार गोरे यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. भाजपमधून दोघांची नावे आघाडीवर असली, तरी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणाला झुकते माप देणार याकडे लक्ष असणार आहे.

त्यातच जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी साताऱ्याला आणखी एक मंत्रिपद देऊन पक्षाची ताकद आणखी वाढविण्याचा भाजपचा विचार असणार आहे, तर शिंदेसेनेकडून शंभूराज देसाई मंत्री आहेत. त्यामुळे शिवसेनेकडून कोणाला मंत्रिपद मिळणार नाही हे स्पष्ट आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

नवीन प्रशस्त मरिन ड्राइव्हची पर्यटकांना भुरळ

'क्वीन नेकलेस'चे विलोभनीय दृश्य पुन्हा पाहता येणार

मुंबई : मुंबईतीलसर्वांत आकर्षणाचे ठिकाण असणाऱ्या मरिन ड्राइव्ह परिसरातील १.०७ किलोमीटर लांबीचा पदपथ पुन्हा पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाच्या कामासाठी हा पदपथ बंद ठेवण्यात आला होता. मात्र, आता जी. डी. सोमाणी चौक ते सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह या दक्षिण ते उत्तर दिशेच्या टप्प्यातील पदपथ आता वापरासाठी पालिकेने उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे पर्यटकांना पावसाळ्यात तेथे उसळणाऱ्या समुद्राच्या लाटांचा, तर रात्रीच्या वेळेस राणीचा रत्नहार अर्थात 'क्वीन नेकलेस'चे विलोभनीय दृश्य पुन्हा पाहता येणार आहे. मरिन ड्राइव्हवर पर्यटकांना बसण्याची पूर्वी सारखीच आसनव्यवस्था केली आहे. शिवाय चांगल्या प्रकाश व्यवस्थेसाठी पथदिवे उभारण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

अतिरिक्त सेवा रस्ता, तसेच पदपथही पर्यटकांसाठी खुला झाला आहे. या पदपथाच्या शेजारच्या समुद्राच्या भिंतीची उभारणी ही बीम आणि कॉलमचा वापर करून केली आहे. त्यामुळे अतिरिक्त भराव न घालताच आतल्या बाजूला हा नवीन पदपथ तयार केला आहे. या पदपथाला धडकणाऱ्या समुद्राच्या लाटांचा आघात रोखण्यासाठी तसेच लाटांचा वेग कमी करण्यासाठी टेट्रापॉडचा वापर केला आहे. मरिन ड्राइव्ह येथील ५९० मीटर भागात टेट्रापॉडचे काम दक्षिण ते उत्तर अशा दिशेत सुरू आहे.

वाहतुकीसाठी रस्ता खुला -१) मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) अंतर्गत दुसरा बोगदा १० जूनला वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

२) या परिसरात येणाऱ्या पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा देतानाच प्रसाधनगृह आणि पदपथ स्वच्छतेसाठी नियमितपणे देखरेख ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

३) मरिन ड्राइव्हच्या परिसरातील रस्त्याचे रुंदीकरण या प्रकल्पाच्या निमित्ताने करण्यात आले आहे.

सेवा रस्त्याचा वापर बोगद्याच्या प्रवेशासाठी-

१) १०.५६ मीटर रुंदीचा आणि सरासरी एक किलोमीटर लांबीचा रस्ता प्रिन्सेस स्ट्रीट उडाणपूल ते मफतलाल क्लब सिग्नलदरम्यान वापरासाठी उपलब्ध झाला आहे. २) प्रिन्सेस

स्ट्रीट उड्डाणपूल ते उत्तर वाहिनीच्या दिशेला रॅम्पला जोडणारा ४०० मीटरचा अंतराचा रस्ता तयार करण्यात आला आहे.

यापूर्वी अस्तित्वातील पदपथाचा वापर करून त्यावर हा रस्ता तयार करण्यात आला आहे.३) त्यापुढील रस्ता मफतलाल सिग्नलपर्यंत, असा सरासरी एक किमी लांबीचा नवा रस्ता वापरासाठी उपलब्ध झाला आहे. प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुलाच्या शेजारच्या या अतिरिक्त सेवा रस्त्याचा उत्तर बोगद्याच्या प्रवेशासाठी वापरता येणार आहे.

बुवाबाजी करून राजकारणाला बट्टा लावणाऱ्या पटोलेंनी राजीनामा द्यावा

भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांची मागणी

सातारा : अनेक निवडणुकांमधील सततच्या पराभवांनंतर लोकसभा निवडणुकीत दिसलेला आशेचा एक किरण काँग्रेसमधील सरंजामशाहीला नवसंजीवनी देणारा ठरला असून गांधी घराण्यातील नेतापूजनाची परंपरा पटोले पूजनापर्यंत पोहोचल्याचे आता पहावयास मिळत आहे. पराजयातही विजयाच्या उन्मादाने उन्मत्त झालेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी चक्क कार्यकर्त्यांकरवी पाद्यपूजा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला काळीमा फासणारा असून याचे जाहीर प्रदर्शन करणाऱ्या नाना पटोलेंनी ताबडतोब पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून संन्यास घ्यावा अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

देशाच्या राजकारणात काँग्रेसने व्यक्तिपूजेची परंपरा सुरू केली. गांधी घराण्याचे हुजरे यामध्ये आघाडीवर राहिले. अनेक निवडणुकांत सातत्याने होणाऱ्या पराभवानंतर काही जागांवर मिळालेल्या यशामुळे हुरळून गेलेल्या पटोले यांच्या अशा सरंजामशाहीला महाराष्ट्राच्या राजकारणात थारा दिला जाणार नाही, असेही श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी या पत्रकात म्हटले आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांना मुंबई पालिकेचा दणका; ४४ कोटी रुपयांची दंडवसुली

मुंबई : मालमत्ताकराची थकीत रक्कम न भरणाऱ्यांकडून मुंबई महापालिकेने दोन टक्के दंड आकारण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत एक लाख नऊ हजार २३४ थकबाकीदारांना हा दंड ठोठावत त्यांच्याकडून ४३ कोटी ९९ लाख रुपयांचा दंड वसूल केल्याचे पालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाकडून सांगण्यात आले.

यंदाच्या आर्थिक वर्षात म्हणजेच २०२४-२५ म्हणजेच ३१ मार्चपर्यंत मालमत्ताकराची थकीत रक्कम भरण्यासाठी पालिकेने २५ मेपर्यंत मुदत दिली होती. २५ मेपर्यंत थकीत रक्कम न भरल्यास दोन टक्के दंड आकारण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला होता. मात्र, पालिकेच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणे थकबाकीदारांना चांगलेच महागात पडले आहे.

२०२४-२५ चालू आर्थिक वर्षात थकीत रक्कम न भरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. पालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागाने एक लाख नऊ हजार

२३४ मालमत्तांवर अधिनियमातील तरतुदीनुसार कलम २०२ अन्वये ४३ कोटी ९९ लाख रुपये दंडापोटी वसूल केल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

१०८ टक्क्यांपेक्षा अधिक कर जमा-

मालमत्ता कर थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्याचा इशारा देताच थकीत कर भरण्यासाठी मालमत्ताधारकांची झोप उडाली होती. पालिकेच्या इशाऱ्यानंतर २५ मे या मुदतीत तब्बल चार हजार ८५६.३८ कोटींचा मालमत्ता कर जमा झाला. चार हजार ५०० हजार कोटींचे टार्गेट असताना ३५६.३८ कोटी अधिक जमा झाले असून १०८ टक्के अधिकचा कर जमा झाल्याचे पालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागाकडून सांगण्यात आले.

मुदतवाढ देऊनही दुर्लक्ष -

१) जकात बंद झाल्यानंतर मालमत्ता कर हाच पालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. २०२४-२५ मधील मालमत्ता कर भरण्यासाठी २६ फेब्रुवारीपासून बिले पाठविण्यास सुरुवात केली आणि ३१ मार्च २०२४ पर्यंत ४५०० कोटींच्या करवसुलीचे उद्दिष्ट ठेवले होते.

२) बिले उशिराने पाठविल्याने ३१ मार्चपर्यंत कर भरणा करणे शक्य नसल्याने २५ मे २०२४ ही अखेरची मुदत दिली होती. मालमत्ताधारकांनी दिलेल्या मुदतीत करभरणा करावा आणि दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले होते. मात्र एक लाखाहून अधिक मालमत्ताधारकांनी दुर्लक्ष केल्याने दोन टक्के दंड आकारण्यात आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

अंबाबाई देवीच्या दागिन्यांचे मुल्यांकन सुरू

कोल्हापूर : करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या २०२० सालापासूनच्या दागिन्यांचे मुल्यांकन मंगळवारपासून सुरू झाले. यापूर्वी २०१९ सालापर्यंतच्या दागिन्यांचे मुल्यांकन झाले आहे. त्यानंतरच्या काळात कोरोना सुरू झाला. आता मुल्यांकनाला मुहुर्त लागला असून नाशिक येथील वडनेरे न्ड सन्स या सरकारमान्यताप्राप्त संस्थेकडून पुढील दहा दिवस ही प्रक्रिया केली जाईल. दागिना देवीला अर्पण झाला त्यावर्षी ३१ मार्च रोजी सोन्या-चांदीचा दर किती होता यावरून दागिन्याचे मुल्य ठरवले जाईल.

देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अंबाबाईच्या दर्शनासाठी रोज हजारो भाविक येतात. यथाशक्ती देवीला सोन्या-चांदीचे अलंकार अर्पण करतात. या दागिन्यांचे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीकडून मुल्यांकन करून घेतले जाते. सन २०१९ पर्यंतच्या दागिन्यांचे मुल्यांकन झाले होते. आता २०२०-२१ या आर्थिक वर्षापासूनच्या दागिन्यांच्या मुल्यांकनाला सुरुवात झाली.

समितीच्या मंदिर आवारातील कार्यालयात नितीन वडनेरे, सचिन वडनेरे यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश पिंपळगावकर, विशाल आगरकर, महेश महामुनी, एकनाथ पारखी यांच्यासह सात जणांची टीम

मुल्यांकन करत आहे. यावेळी मंदिर व्यवस्थापक महादेव दिंडे, समितीच्या सहसचिव शीतल इंगवले, खजिनदार महेश खांडेकर, निवास चव्हाण उपस्थित होते.

सोने : मणी, मंगळसुत्र, अंगठी, सोन्याची नाणी, नथ, कानातले, हार, नेकलेस, बोरमाळ, किरीट.

चांदी : पैंजण जोडवी, पाळणे, डोळे, फुलं, नामी, अंगठी, देवीची मूर्ती, छत्र, देवीची प्रतिमा, किरीट.

पोर्शे अपघातात नेमकं घडलं काय? बाल न्याय मंडळास सखोल अहवाल सादर

पुणे : कल्याणीनगर अपघात प्रकरणाला बुधवारी (दि. १९) एक महिना पूर्ण होत आहे. या महिनाभरात पुणे पोलिसांनी सखोल तपासणी अहवाल तयार करून बालन्याय मंडळास सादर केला आहे. या घटनेत नेमकं घडलं काय? कुणाचा होता सहभाग? आई-वडिलांनी मुलाच्या रक्ताचे नमुने कुठे आणि कसे नष्ट केले? याचा संपूर्ण वृत्तांत अहवालात मांडला आहे.-

कल्याणीनगर येथे १९ मे रोजी पहाटे अडीचच्या सुमारास बड्या बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने 'पोर्शे' कार भरधाव चालवून दुचाकीस्वार सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुण-तरुणींना उडविले होते. त्यामध्ये या तरुण-तरुणीचा जागेवरच मृत्यू झाला होता. मुलाला १५ तासांत जामीन देण्यात होता.

यामुळे पोलीस प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी बाल न्याय मंडळाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध सत्र न्यायालयात अर्ज करून अल्पवयीन आरोपीला सज्ञान समजावे, यासाठी अर्ज केला होता. सत्र न्यायालयाने पुणे पोलिसांना परत बाल न्याय मंडळात अर्ज करण्यास सांगितले. त्यानुसार पुणे पोलिसांनी मंडळात अर्ज केला असता अल्पवयीन मुलाला १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या.यासंदर्भात दोनवेळा वाढ केली आहे. घटनेच्या एक महिन्याच्या आत बाल न्याय मंडळास अहवाल देणे बंधनकारक असतो. त्यामुळे पुणे पोलिसांनी हा अहवाल बाल न्याय मंडळास सुपूर्द केला आहे. अल्पवयीन मुलाचा मुक्काम २५ जूनपर्यंत बालसुधारगृहात वाढविण्यात आला आहे.बदललेले रक्त फेकले बायोलॉजिकल वेस्टमध्ये :अपघात झाल्यानंतर वैद्यकीय चाचणीच्या दरम्यान ससून रुग्णालयात अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. मुलाची अल्कोहोल टेस्ट निगेटिव्ह यावी यासाठी ससूनमधील डॉक्टरांच्या मदतीने शिवानी अग्रवाल यांचे रक्त घेण्यात आले. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने अल्पवयीन मुलाचे रक्त हे बायो मेडिकल वेस्टमध्ये फेकून दिल्याचे तपासात समोर आले आहे. ससूनमधील बायो मेडिकल वेस्टची विल्हेवाट लावण्याचे काम एक कंपनी करते. पोलिसांनी फेकून देण्यात आलेल्या मुलाचे रक्ताचे नेमके काय झाले याची माहिती कंपनीकडून घेत आहेत. विशाल अग्रवालनेच दिले ते पैसे :अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी ससून रुग्णालयातील शिपाई अतुल घटकांबळे याला आरोपी अश्फाक मकानदार याने येरवडा येथील बाल न्याय मंडळाच्या परिसरात तीन लाख रुपये दिले होते. घटकांबळे याने यातील अडीच लाख रुपये डॉ. श्रीहरी हाळनोर आणि स्वतःकडे ५० हजार ठेऊन घेतले होते. डॉक्टरांना देण्यात आलेले तीन लाख रुपये विशाल अग्रवाल याने कल्याणीनगर येथील एका हॉटेलमध्ये अश्फाक मकानदार याला दिल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणाचा सखोल तपासणी अहवाल बाल न्याय मंडळाला दिला आहे.

कोरेगावातील वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यां विरोधात शेतकऱ्याची लोकायुक्तकडे तक्रार

कोरेगाव : अस्तित्वात नसलेल्या शेत जमिनीवरील रस्त्याबाबत एकतर्फी निकाल देऊन शेतकऱ्याचे नुकसान केल्याप्रकरणी कोरेगावातील वरिष्ठ तीन महसूल अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकरी श्री.धन्यकुमार जाधव यांनी लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. दस्तुरखुद शेतकऱ्यांनीच लोकायुक्तांकडे कैफियत मांडल्यामुळे खळबळ माजलेली आहे. याबाबत माहिती अशी की, दुधनवाडी पोस्ट बनवडी ता. कोरेगाव येथील शेतकरी संघटनेचे नेते व शेतकरी श्री धन्यकुमार जाधव यांनी गावातील रस्त्याबाबत तक्रार अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी निपक्षपातीपणाने होऊन त्यांना न्याय मिळावा. यासाठी ते लोकशाही मार्गाने लढा देत होते. परंतु, वाठार स्टेशन मंडलाधिकारी यांनी खोटा अहवाल सादर करून तसेच स्थानिक चौकशी न करता निकाल देण्यासाठी पैशाची मागणी केली. त्या मागणीची पूर्तता न केल्यामुळे उपविभागीय अधिकारी कोरेगाव, तहसीलदार कोरेगाव व मंडलाधिकारी वाठार स्टेशन यांनी चुकीचा अहवाल करून चुकीचे रेकॉर्ड बनवले आहे. तसेच त्या आधारे निकाल दिला आहे. असा गंभीर आरोप शेतकरी श्री जाधव यांनी केला आहे. याबाबत कोरेगाव तालुक्यात कार्यरत असणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या स्थावर जंगम मालमत्तेची चौकशी करावी व त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. असा लेखी अर्ज लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे केला आहे . सदर प्रकरणाबाबत कोरेगाव तालुक्यातील महसूल खात्यातील अधिकाऱ्यांच्या विरोधात लोकायुक्त कडे धाव घेतल्यामुळे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. अशी मागणी आता परिसरातील शेतकऱ्यांनी केलेली आहे. कोरेगाव तालुक्यात तीन आमदार असताना शेतकऱ्यांना न्यायासाठी लोक आयुक्ताकडे तक्रार करावी लागत आहे. याचे आता मतदारांनीच विचार करणे गरजेचे आहे. असेही आता शेतकरी सांगू लागलेले आहेत.

शेतीसाठी आवश्यक रस्ता मिळावा. यासाठी महसूल खात्याकडे प्रत्यक्ष अर्ज आले आहेत का? अर्जासोबत आवश्यक कागदपत्र जोडले आहेत का? संपूर्ण या रस्त्याबाबतचे सर्व सत्य माहिती समोर आली आहे का? असे प्रश्न त्यांनी अर्जात उपस्थित केलेले आहेत.

लोकसभेतील पराभवानंतर महायुतीचा मोठा निर्णय

राज्य सरकारच्या 'या' महत्त्वाच्या प्रकल्पाला स्थगिती!

नागपूर ते गोव्याला जोडणाऱ्या ८०२ किमीचा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाचे काम तात्पुरत्या स्वरुपात थांबवण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी राज्याच्या तिजोरीवर ८० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध होता. हा विरोध डावलून महाराष्ट्र सरकारकडून प्रकल्प राबवला जात होता. परिणामी लोकसभेतील पराभवानंतर या कामाला स्थगिती देण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर नवीन सरकार आल्यावर या प्रकल्पाबाबतन निर्णय घेईल, असं एका अधिकाऱ्याने इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं.

या प्रकल्पातील बाधित शेतकरी आणि इतर ग्रामस्थ या प्रकल्पाला प्रत्येक जिल्ह्यातून विरोध करत असल्याचा अहवाल आम्हाला प्राप्त झाला आहे. किमान पुढील ३-४ महिने जमीन संपादित करू नयेत असे प्रशासनाला कळविण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर (ऑक्टोबरमध्ये) नवीन सरकार या प्रकल्पाचे भवितव्य ठरवेल, असे या प्रकल्पाशी संबंधित एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने इंडियन एक्सप्रेसला सांगितले.

शक्तीपीठ महामार्ग ११ जिल्ह्यांतून जाणार

या प्रकल्पाची पहिल्यांदा घोषणा सप्टेंबर २०२२ मध्ये करण्यात आली. २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी निधी मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार चडठऊने एक व्यवहार्यता अभ्यास केला होता आणि एक्स्प्रेस वेसाठी भूसंपादन करण्यासंदर्भात कलम १२ (२) ची अधिसूचना जारी केली होती. ई-वे नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यातील पवनारला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवीशी जोडण्याचा प्रस्ताव आहे. वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या ११ जिल्ह्यांतून हा रस्ता जाणार आहे.

११ जिल्ह्यांतील हिंदू धार्मिक तीर्थक्षेत्रांना जोडणारा महामार्ग

फेब्रुवारी २०२४ मध्ये, राज्य सरकारने या प्रकल्पासाठी हिरवा सिग्नल दिला. यामुळे ११ जिल्ह्यांतील सर्व महत्त्वांच्या हिंदू धार्मिक तीर्थक्षेत्रांना हा रस्ता जोडणार होता. म्हणूनच या महामार्गाला शक्तीपीठ ई-वे असे नाव देण्यात आले. प्रकल्पासाठी आवश्यक ८ हजार ४१९ हेक्टरपैकी सुमारे ८ हजार १०० हेक्टर खाजगी शेतजमीन आहे. त्यामुळे जमीन हस्तांतरणासाठी शेतकऱ्यांकडून सातत्याने निदर्शने होत आहेत आणि सत्ताधारी महायुतीसह राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी शेतकऱ्यांना पाठिंबा दिला आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शक्तीपीठ महामार्गातील ११ पैकी १० जिल्ह्यांमध्ये महायुतीचा पराभव झाला. विधानसभा निवडणुका काही अंतरावर असल्याने महायुतीने बचावात्मक पवित्रा घेतला आहे. सर्वाधिक बागायत क्षेत्र असलेल्या कोल्हापुरात प्रकल्पाला होणारा विरोध हा कळीचा मुद्दा होता. प्रचारादरम्यान शेतकरी नेते आणि हातकणंगले येथील उमेदवार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला भूसंपादनाचा निर्णय न घेण्याचा इशारा दिला होता. निवडणुकीच्या निकालानंतर कोल्हापुरातील नवनिर्वाचित खासदार आणि पराभूत उमेदवारही या प्रकल्पाच्या विरोधात सामील झाले.

सत्ताधाऱ्यांपासून विरोधकांपर्यंत सर्वांचा प्रकल्पाला विरोध

मंगळवारी कोल्हापुरातील शेकडो शेतकरी या प्रकल्पाला विरोध करत रस्त्यावर उतरले. गेल्या आठवड्यात सत्ताधारी शिवसेना नेते संजय मंडलिक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना या प्रकल्पाविरोधातील निवेदन

दिले होते.

या रस्त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्याऐवजी ते यात्रेकरू केंद्रांना जोडण्यासाठी छोटे बायपास रस्ते तयार करू शकतात, असे मंडलिक म्हणाले.

कोणतीही मागणी लक्षात न घेता या रस्त्याचे नियोजन करण्यात आले असून यामुळे शेतजमिनी नष्ट होऊन शेतकऱ्यांचे हित धोक्यात येणार आहे, असं शाहू महाराज म्हणाले होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ यांनीही महायुतीच्या पराभवामागे शक्तीपीठ द्रुतगती मार्ग हे एक कारण असल्याचे सांगितले.

नांदेडचे भाजपाचे राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांनीही शिंदे यांना पत्र लिहून त्यांच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विरोध कळवला आहे. फक्त नांदेडमध्येच नाही तर प्रत्येक जिल्ह्यात शेतकरी आंदोलन करत आहेत. याबाबत मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री दादा भुसे यांच्याशी बोललो आहे. त्यांनी पुढील सूचना मिळेपर्यंत काम थांबवण्याचे मान्य केले आहे, असे चव्हाण म्हणाले.

MSRDC च्या अधिकाऱ्यांनी काय सांगितलं?

MSRDC चे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक कैलास

कराडमधुन अपेक्षित मतदान मिळाले नाही म्हणुन आपला पराभव : आ. शशिकांत शिंदे

महाबळेश्वर : युतीच्या उमेदवाराचा साताऱ्यात पराभव होणार हे जेव्हा उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी शेवटच्या तीन दिवसात सर्व अस्त्रे शस्त्रे घेवुन पूर्ण शक्ती पणाला लावली हे एक कारण असुन दुसरे आपल्याला कराड मधुन अपेक्षित मतदान मिळाले नाही म्हणुन आपला पराभव झाला. परंतु या पराभवाने खचणारा मी नाही मी लढणारा आहे मी पुन्हा ताकतीने उभा राहणार असे सांगुन अधिवेशना नंतर मी जिल्हा संपर्क दौरा करणार असल्याचे आ शशिकांत शिंदे यांनी येथे बोलताना सांगितले.

सातारा विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचे उमेदवार आ शशिकांत शिंदे यांचा निसटता पराभव झाला. महाबळेश्वर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या वतीने महाबळेश्वर येथील पुनम हॉटेलच्या सभागृहात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यां साठी आ शशिकांत शिंदे यांच्या आभार दौरा आयोजित केला होता या वेळी आ शशिकांत शिंदे हे बोलत होते. या वेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष डी एम बावळेकर विराज शिंदे डॉ सावंत विश्वनाथ सपकाळ किसन भिलारे राजेश कुंभारदरे नदीम शारवान राजश्री भिसे सुजाता मोरे संपत जाधव महेश गुजर शिल्पा ठक्कर वसुधा बगाडे उस्मान खारखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

एका बाजुला महाशक्ती होती ४०० पारचा नारा देवुन त्यांनी सर्व शक्ती पणाला लावली होती तरी देशातील जनतेने त्यांचा उधळलेला वारू रोखला त्यांना स्वबळावर बहुमत देखिल मिळाले नाही दोन पक्षांच्या कुबडया घेवुन त्यांना केंद्रात सरकार स्थापन करावे लागले महाराष्ट्रात देखिल ४० खासदारांचे स्वप्न पाहणारयांना १७ वर रोखण्यात आघाडीला यश आले लोकसभेत आपल्या ज्या चुका झाल्या त्या दुरूस्त करून पुन्हा विधानसभा निवडणुकासाठी आपल्याला सज्ज व्हावे लागेल मी तुमच्या बरोबर आहे पाच वेळा आमदार झालो. मंत्री झालो त्या पेक्षा आपल्याला अधिकची अपेक्षा नाही परंतु लोकसभेत ज्या पध्दतीने आपण आपल्या एकीचे दशर्न घडविले त्याच प्रमाणे विधानसभेत काम करून राज्यातील महायुतीच्या सरकारला घरी बसवावे लागेल तुम्ही पाहीले आहे की पक्ष फोडले अनेकांना बरोबर घेतले., तरी त्यांना पराभव पत्करावा लागला ही निवडणुक जनतेने आपल्या हातात घेतली आहे मला ५ लाखापेक्षा अधिक मते मिळाल्याने माझी जबाबदारी वाढली आहे. अधिवेशन झाल्या नंतर मी पुन्हा येतो आपण गावागावत जावू घरोघरी जावू असे सांगुन आ शिंदे यांनी आता राज्यात सरकार हे महाविकास आघाडीचेच येणार असा विश्वास व्यक्त केला.

अनेक कार्यकर्त्यांना आजही धमकीचे फोन येत आहेत परंतु तुम्ही घाबरू नका मी अजुन २०२६ पर्यंत आमदार आहे जशास तसे उत्तर देवु मी तुमच्या पाठीशी ठाम उभा आहे असे स्पष्ट करून आ शशिकांत शिंदे म्हणाले की केंद्रातील सरकार देखिल जास्त दिवस टिकणार नाही आपले नेते त्या दृष्टीने कामाला लागले आहे तुम्ही विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागा असेही आ शशिकांत शिंदे यांनी या वेळी बोलताना स्पष्ट केले.

प्रारंभी महाबळेश्वरचे माजी नगराध्यक्ष , राजेश कुंभारदरे व विश्वनाथ सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले या वेळ महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते दुर्गेश प्रभाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार किसन भिलारे यांनी मानले आशिष चोरगे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी हा दौरा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

पाणीपुरी खाल्ल्याने ८० पेक्षा अधिक जणांना विषबाधा

चोपडा : कमळगाव येथे सोमवारी आठवडे बाजारात पाणीपुरी खाल्ल्याने सुमारे ८० पेक्षा अधिक जणांना विषबाधा झाली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

कमळगाव आणि आजूबाजूच्या खेड्यांतील तसेच चांदसणी, मितावली, पिंप्री येथील ग्रामस्थ बाजारासाठी आले असताना तेथील पाणीपुरी विक्रेत्यांकडून अनेकांनी पाणीपुरी खाल्ली तर काहींनी पाणीपुरीचे पार्सल घरी नेले होते. या पाणीपुरी खाल्लेल्यांना मंगळवारी सकाळी उलट्या, जुलाब, पोटात दुखणे असे त्रास जाणवू लागले. यापैकी अनेक रुग्णांनी खासगी रुग्णालयात उपचार घेतले. परंतु, संध्याकाळी ६ वाजेनंतर अचानक रुग्णांमध्ये वाढ झाली.३० रुग्ण उपजिल्हा रुग्णालयातअडावद प्राथमिक आरोग्य केंद्रासह अडावद व चोपडा येथील खासगी रुग्णालयांतही अन्नामुळे विषबाधा झालेल्या रुग्णांची संख्या वाढतच गेली. यापैकी डिंपल कोळी (१६), आयर्न सपकाळे (७), पवन सोनवणे (१३), निकिता कोळी (१३), चेतना सपकाळे (१९) यांच्यासह ३० जणांना उपजिल्हा रुग्णालय चोपडा येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. पाणीपुरीमुळे त्रास झाल्याबाबत सोमनाथ जगन कोळी (रा. पिंप्री) यांनी पोलिस स्टेशनला लेखी जबाब दिला आहे. अडावद येथे सायंकाळनंतर अडावद प्राथमिक आरोग्य केंद्रात पिंप्री, कमळगाव येथील विषबाधा झालेले सर्वच वयोगटातील रुग्ण वाढतच गेले. या ठिकाणाहून ७० पैकी ३० रुग्ण चोपडा येथे उपजिल्हा रुग्णालयात व इतर रुग्ण खासगी व जळगाव जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. रात्री सुमारे १० रुग्णांवर अडावद येथे उपचार सुरू होते.

बुवाबाजी करून राजकारणाला बट्टा लावणाऱ्या पटोलेंनी राजीनामा द्यावा

भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांची मागणी

सातारा : अनेक निवडणुकांमधील सततच्या पराभवांनंतर लोकसभा निवडणुकीत दिसलेला आशेचा एक किरण काँग्रेसमधील सरंजामशाहीला नवसंजीवनी देणारा ठरला असून गांधी घराण्यातील नेतापूजनाची परंपरा पटोले पूजनापर्यंत पोहोचल्याचे आता पहावयास मिळत आहे. पराजयातही विजयाच्या उन्मादाने उन्मत्त झालेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी चक्क कार्यकर्त्याकरवी पाद्यपूजा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला काळीमा फासणारा असून याचे जाहीर प्रदर्शन करणाऱ्या नाना पटोलेंनी ताबडतोब पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून संन्यास घ्यावा अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

देशाच्या राजकारणात काँग्रेसने व्यक्तिपूजेची परंपरा सुरू केली. गांधी घराण्याचे हुजरे यामध्ये आघाडीवर राहिले. याच परंपरेचा शिरकाव काँग्रेसमध्ये तळागाळात पोहोचला असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांचे चिखलाने माखलेले पाय चक्क कार्यकर्त्यांनी पाण्याने धुतल्याचा प्रकार अकोला जिल्ह्यातील वाडेगाव येथे समोर आला आहे. अनेक निवडणुकांत सातत्याने होणाऱ्या पराभवानंतर काही जागांवर मिळालेल्या यशामुळे हुरळून गेलेल्या पटोले यांच्या अशा सरंजामशाहीला महाराष्ट्राच्या राजकारणात थारा दिला जाणार नाही, असेही श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी या पत्रकात म्हटले आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेस बट्टा लावणाऱ्या या कृतीबद्दल प्रायश्चित्त म्हणून पटोले यांनी राजकीय संन्यास घेऊन बुवाबाजी सुरू करावी व काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदावर पाणी सोडावे, अन्यथा त्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारू असा इशाराही त्यांनी या पत्रकात दिला आहे.

हातलोट व कासरुड या गावाना जोडणाऱ्या पूलाच बांधकाम संथ गतीने का?

पुलाची पाहणी करताना कोयना खोरे विकास मंडळ मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत मोरे व सरचिटणीस गोविंद मोरे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता अजय देशपांडे.

महाबळेश्वर : महाबळेश्वर तालुका कोयना खोरे विकास मंडळ मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत मोरे व सरचिटणीस गोविंद मोरे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता अजय देशपांडे यांच्यासह काही पदाधिकारी यांनी हातलोट व कासरुड या गावाना जोडणाऱ्या पूलाच्या बांधकामाची पाहणी केली . हातलोट व कसरूड या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाचे काम अपूर्ण असल्याने व पावसाळा सुरु झाल्याने या दोन गावांचा जगाशी असलेला संपर्क तुटला. अशी काही ग्रामस्थांनी तक्रार केली शाळकरी मुळे रुग्ण व नोकरीसाठी शहरात जाणाऱ्या लोकांची गैरसोय होत असल्याचेही ग्रामस्थांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर ही पाहणी करण्यात आली आणि जी वस्तुस्थिती आहे ती ग्रामस्थांच्या समोर मांडण्यात आली. या पुलाची पाहणी करण्यासाठी आणि तांत्रिक बाबी तपासण्यासाठी महाबळेश्वर तालुका कोयना खोरे विकास मंडळाचे अध्यक्ष सचिव व त्यांच्या सोबत महाबळेश्वर उद्योगपती डी एल शिंदे व प्रा गणेश कोरे हे देखील होते .या सर्व मान्यवरांनी परिस्थितीचे निरीक्षण केल्यावर व कंत्राटदार सुरज पाटील आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय देशपांडे साहेब यांच्याशी चर्चा केल्यावर पाहणीचा असा निष्कर्ष निघाला की सध्या पावसाळा सुरू झाल्यामुळे वाहतुकीची अडचण निर्माण झाली आहे. हे खरं आहे पण त्याचबरोबर आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की हे काम जलदगतीने केल्यास त्याचा कामाच्या दर्जावर परिणाम होऊ शकतो. पुलाच्या गर्डरचे काँक्रीटीकरण केल्यानंतर किमान २८ दिवस त्यावर स्लॅबचे काँक्रीटीकरण करू नये. कारण एका स्लॅबचे अंदाजे वजन सव्वाशे टन आहे. त्यामुळे गर्डरच्या स्थिरतेला आणि मजबुतीला धोका निर्माण होण्याची शक्यता उद्भवते. म्हणून काम पूर्ण होण्यास विलंब होत आहे . तसेच कंत्राटदारास काम पूर्ण होण्याची तारीख जानेवारी २०२५ असून देखील जवळजवळ ८५% काम पूर्ण झाले आहे त्यामुळे कंत्राटदाराने पुलाचे काम संथ गतीने केले असे म्हणणे संयुक्तिक नाही .लोकांची अडचण दूर करण्यासाठी पुलावर प्लेट टाकून २-३ दिवसात माणसांची तात्पुरती वाहतूक सुरू होईल तसेच पुलापलीकडे असणाऱ्या ग्रामस्थांची वाहने अलीकडे आणण्यासाठी नदीवर भराव टाकून तात्पुरती व्यवस्था केली आहे तर जी वाहने पलीकडे आहेत त्यानी पावसाचा जोर वाढण्या आधी आपली वाहने अलीकडे काढून घ्यावीत असे आवाहन संस्था पदाधिकारी यांनी ग्रामस्थांना केले आहे . या वेळी श्री बबन मालुसरे , मारुती जाधव , सुनील जाधव , विजय घाडगे आणि शिवाजी मोरे उपस्थित होते .

नागठाणेतील तो खून ऑनर किलिंगच : एसपी समीर शेख

सातारा : बोरगाव पोलीस ठाणे हद्दीतला तो खून ओंनर किलिंगच्या प्रकारातून झाला असल्याची धक्कादायक बाब अवघ्या चार तासात पोलिस तपासातून उघड झाली. मयत रोहिदास पन्हाळकर याचा भावकितील युवकांनी प्लॅनिग करून काटा काढला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बोरगाव पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तीक कारवाई करत गुन्ह्यातील सहभागी ८ जणांना जेरबंद केले. व एका विधिसंघर्ष बालकाची सुधार गृहात रवानगी केली.

ओंकार हणमंत पन्हाळकर (वय २० वर्षे), निखील रमेश पन्हाळकर (वय २२वर्षे),रोहित मारुती पवार (वय २१ वर्षे)

तेजस सचिन पन्हाळकर (वय २१वर्षे),कुमार एकनाथ पन्हाळकर (वय २२ वर्षे),देवेंद्र बनाजी घाडगे (वय २८ वर्षे) संशयीत सहा जण राहणार करंजोशी ता. कराड जि. सातारा, आदित्य नामदेव पवार (वय १८ वर्षे) रा. गडकरआळी सातारा, साहिल जयसिंग पिंपळे (वय १९ वर्षे) रा. मालोशी ता.पाटण जि. सातारा व एका विधी संघर्षग्रस्त बालक अशी अटक केलेल्या संशयीताची नावे आहेत.

बोरगाव पोलीस ठाणे हद्दीत १६ जून रोजी नागठाणे येथे रोहिदास मारुती पन्हाळकर (वय २१ वर्षे)रा.करंजोशी ता कराड जि. सातारा यांस भावकितील युवकांनी कामानिमित्ताने आला असता.,प्लॅनिग करून निर्जन स्थळी बोलवून सर्वांनी मिळून रोहिदास यास मारहाण केली. यात तो मयत झाला.

युवक जखमी झाला असल्याचा बनाव करून त्याचे शवं दुचाकीवर घेऊन गुन्ह्यातील दोन संशयीतानी सातारा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये रोहिदास याला आणले., येथील वैद्यकीय अधिकारी यांनी पाहणी केली असता तो मयत असल्याचे घोषित केले. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर व रोहिदासच्या संदर्भात नातेवाईक, ग्रामस्थ यांच्याकडे चौकशी सुरू झाल्या.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर व तांत्रिक विश्लेषण केल्यावर सिव्हिल मध्ये रोहिदास ला आणलेल्या दोन जणांकडे संशय बाळावले नंतर कसून चौकशी केली.

असताना अपघाताचा बनाव करून त्याला उपचारार्थ दाखल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे तपासात समजले. पुढे एक एक कडी जोडत तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली व त्यातून प्लॅनिंग करून खून केला असल्याचे स्पष्ट झाले.,मयताच्या शरीरावर काठ्यांनी, पट्ट्याने, तसेच जड वस्तूने गंभीर मारहाण झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांना निदर्शनास आले. ओनर किलिंगच्या प्रकारातून हा गुन्हा केला असल्याचे समजल्यानंतर संशयीत ९ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. व एका विधी संघर्षग्रस्त बालकाची सुधार गृहात रवानगी केली.

आमदार बेनके यांच्या गावातील मुलावरच बिबट्याचा हल्ला

नारायणगाव : जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांचे मूळ गाव असलेल्या हिवरे जवळील भोरवाडी येथील सतरा वर्ष वयाच्या मुलावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केले आहे.

ही घटना रविवार दिनांक १६ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास भोरवाडी येथे घडली.

दरम्यान सातत्याने जुन्नर तालुक्यातील वेगवेगळ्या गावांमध्ये बिबट्यांचे मनुष्य प्राण्यांवरील हल्ले दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत.

बिबट्याने केलेल्या हल्ल्याबाबत माहिती अशी की यश संदीप भोर (वय १७, राहणार भोरवाडी हिवरे ता. जुन्नर) हा बारावी मध्ये असलेला विद्यार्थी रात्री साडेआठ वाजता घरातील वीज प्रवाह खंडित झाल्यामुळे मोबाईलच्या टॉर्च च्या प्रकाशात घरातून बाहेर चालला होता. त्यावेळी रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घातली मात्र तात्काळ यशने विरुद्ध बाजूला पळण्याचा प्रयत्न केला तेव्हा पाठमोरा झालेल्या यशच्या पायाच्या पोटरीवर बिबट्याने पंजा मारला. बिबट्याचा आवाज व मुलाच्या ओरडण्याचा आवाज ऐकल्यानंतर तेथे समीर भोर व संतोष भोर यांनी ते पाहून आरडाओरडा केल्याने बिबट्या तिथून पसार झाला. बिबट्याच्या हल्ल्यात हा मुलगा जखमी झाल्यावर त्याला तात्काळ नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

सोमवारी दुपारी ग्रामीण रुग्णालयात आमदार वल्लभ बेनके तसेच माजी आमदार शरद सोनवणे यांच्यासह भोरवाडी चे सामाजिक कार्यकर्ते शरद बिबवे, ग्रामपंचायत सदस्य शरद भोर, ट्रस्टचे विश्वस्त संजय चासकर, जखमी मुलाचे वडील संदीप गजानन भोर व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान जखमी मुलाच्या नातेवाईकांनी वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांना मोबाईल द्वारे संपर्क साधला असता त्यांनी मोबाईल रिसीव केला नाही. घडलेल्या घटनेची हकीकत जखमी यशने सांगितली असून तालुक्यातील सर्वच बिबट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहेत.

अआरोग्य वर्धिनी केंद्राच्या माध्यमातून लोकांना चांगले उपचार व चांगल्या आरोग्यदायी सोयी सुविधा मिळाव्यात : आ. जयकुमार गोरे

वडूज : वडूज ता.खटाव येथे सुरू झालेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना,आरोग्य वर्धिनी केंद्राच्या माध्यमातून लोकांना चांगले उपचार व चांगल्या आरोग्यदायी सोयी सुविधा मिळाव्यात. आपला दवाखान्याला आपल्यापरीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे प्रतिपादन आमदार जयकुमार गोरे यांनी केले. राज्य शासनाच्यावतीने येथे सुरू करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या इमारतीचे उदघाटन करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात आमदार गोरे बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.महेश खलीपे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.बजरंग खाडे, गटविकास अधिकारी सर्जे राव पाटील, नगराध्यक्षा मनिषा

काळे, उपनगराध्यक्ष मनोज कुंभार,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.युनूस शेख, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी कपिल जगताप, पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिक्षा जगदाळे यांची

वडूज : येथे आपला दवाखान्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार जयकुमार गोरे. त्या वेळी डॉ. दिलीप येळगावकर, मनीषा काळे, डॉ. महेश खलिपे ,कपिल जगताप आदी.

प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार जयकुमार गोरे म्हणाले की, विविध विकासकामांच्या माध्यमातून खटाव तालुक्याचा चेहरामोहरा बदलत आहे. वडूज येथे सुरू झालेले आरोग्य वर्धिनी केंद्र हे वडूज शहराच्या नावलौकीकात भर घालणारे आहे. या केंद्राच्या माध्यमातून रूग्णांना चांगल्या आरोग्य सोयी सुविधा मिळाव्यात. केंद्र व राज्य सरकार विविध जनकल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत आहे. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य

योजनेत बहुतांशी आजार समाविष्ट करून राज्य सरकारने जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली आहे. तर केंद्र शासनाने आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून नागरिकांना पाच लाख रूपयांपर्यंत मोफत उपचाराची सोय केली आहे. या दवाखान्यात सर्प दंश लस कायम उपलब्ध असावी. रुग्णांची गैरसोय होणार नाही अश्याप्रकारे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी काम करावे. डॉ.येळगावकर म्हणाले, आमदार गोरे यांच्यामुळे वडूज याठिकाणी राज्य शासनाचा आपला दवाखाना सुरू होत आहे. आमदार गोरे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना,उपक्रम

खटाव,माण तालुक्यांत प्रभावीपणे राबविल्या आहेत. येथील ग्रामीण रूग्णालयात रूग्णांशी सौहार्दपूर्ण वागणारे चांगले अधिकारी नेमावेत. जिल्हा आरोग्य विभागाने तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरावस्था थांबवावी. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांत संबंधित अधिकारी किती वेळ हजर असतात त्यांची तपासणी करावी

.नगराध्यक्षा सौ. काळे म्हणाल्या, वडूजचे ग्रामीण रुग्णालय वडूज शहराच्या बाहेर सुमारे दोन किलोमीटरवर असल्याने त्याठिकाणी रूग्णांची येण्या-जाण्याची मोठी अडचण होत असते. वडूज शहरात मध्यवर्ती सुरू झालेला आपला दवाखाना रुग्णांना अतिशय सोयीचा ठरणारा आहे. याशिवाय खासगी दवाखान्यातील उपचार सर्वसामान्य रुग्णांना परवडणारे नसल्याने आपला दवाखान्याच्या माध्यमातून रूग्णांची चांगली सोय होण्यास मदत झाली आहे. नगरसेविका सौ.रेश्मा बनसोडे यांनीदेखील शहरात सुरू झालेल्या आपला दवाखान्यामुळे रूग्णांची सोय झाली असल्याचे सांगून या दवाखान्याला आवश्यक जाणवणाऱ्या उपलब्धतेबाबतची मागणी यावेळी केली.सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा परशुराम घार्गे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दवाखान्याच्या उदघाटनाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी दवाखान्याची पाहणी केली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपन करण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. महेश खलीपे यांनी केले. सुत्रसंचालन प्रसाद जगदाळे, चंद्रकांत कोकाटे यांनी केले.मुख्याधिकारी श्री.कपिल जगताप यांनी आभार मानले. यावेळी आप्पासाहेब गोडसे , मा.पंचायत समिती सदस्य नंदकुमार गोडसे (भैय्या) ,निलेश (काका) गोडसे , मा.सरपंच अणिल (आण्णा) गोडसे , भरत (आप्पा) माळी , नगरसेवक सचिनशेठ माळी , मा नगराध्यक्ष सुनिल गोडसे, संदिप गोडसे आण्णा , रविंद्रशेठ काळे, शशिभाऊ पाटोळे, वडूज शहर अध्यक्ष प्रदिपजी शेटे , अनिल माळी, गणेशशेठ गोडसे ,जयवंत पाटील, अमोलशेठ गोडसे ,सोमनाथशेठ जाधव , वचनशेठ शहा , विनायक खाडे, राजेंद्र चव्हाण (काका), विक्रमशेठ रोमन, श्रीकांत (काका) बनसोडे, जय मल्हार करिअर एकॅडमी चे संस्थापक अध्यक्ष बनाजी पाटोळे सर , चंद्रकांत कोकाटे, संभाजी गोडसे (मंत्री), निलेश कर्पे ,रणजीत गोडसे (भैय्या), भैरवनाथ यात्रा कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब काळे (पाटील) सावकार , नगरसेविका रेश्मा बनसोडे , आरती काळे , स्वप्नाली गोडसे , राधिका गोडसे , नगरसेवक ओंकार चव्हाण, श्रीकांत काळे , प्रदिप खूडे , प्रतिक बडेकर, शशीभाऊ काळे, अक्षय थोरवे , सुभाष लोहार, आकाश जाधव, सुधिर गोडसे, बापू ननावरे , राहुल लोहार, संदिप पाटोळे , सागर भाऊ पाटोळे आदीसह कार्यक्रमास नगरपंचायतीचे पदाधिकारी,कर्मचारी, नगरसेवक, नगरसेविका, शहरातील मान्यवर तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.